# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. 15 अंतर्गत नागपूर विद्यापीठ आणि विज्ञान संस्थान, नागपूर
**{प्रकल्प विभाग }** या दोन्ही इमारती पासुन ते फ्रिडम पार्क पर्यंतच्या नवनिर्मित डी.पी. रस्त्याला "**स्व. दत्ताजी डिडोळकर मार्ग**" असे नामकरण करण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मधील अनुसुची प्रकरण 11 मधील 2 (1) नुसार वरील मार्गाचे नामकरण करण्यास्तव मा. आयुक्त यांनी दिनांक 03/08/2023 ला मंजुरी प्रदान केलेली आहे.
2. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.
3. मा.श्री .नितीनजी गडकरी, मंत्री सड़क परिवहन एवं राजमार्ग भारत सरकार यांचे संमतीपत्र.
4. डॉ. मुरलीधर चांदेकर सयोजक, मा. दत्ताजी डिडोळकर जन्मशताब्दी समारोह समिती नागपूर यांचे संमतीपत्र.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 481/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 04/08/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. 15 अंतर्गत नागपूर विद्यापीठ आणि विज्ञान संस्थान, नागपूर या दोन्ही इमारती पासुन ते फ्रिडम पार्क पर्यंतच्या नवनिर्मित डी.पी. रस्त्याला "**स्व. दत्ताजी डिडोळकर मार्ग**" असे नामकरण करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**